# यावल महाविद्यालयात निबंध व प्रश्नमंजुषा स्पर्धा संपन्न



लाभार्थींवर कारवाई व शासनाच्या निधीची वसुली करण्यात यावी अशी मागणी तक्रारदार यांनी केले आहे.(श.प्र)

## यावल महाविद्यालयात निबंध, प्रश्नमंजुषा स्पर्धा

देशोन्नती वृत्तसंकलन...

**यावल ■** येथील महाविद्यालयात मतदार दिनानिमित्त आयक्यूएसी अंतर्गत विद्यार्थी विकास कक्ष व कनिष्ठ विभाग यांच्या संयुक्त विद्यमाने निबंध व प्रश्नमंजुषा स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

याप्रसंगी विद्यार्थ्यांमध्ये मतदार नोंदणी व मतदानाचा हक्क यासंदर्भात जाणिवा निर्माण होणे या उद्देशाने या स्पर्धा घेण्यात आल्या. निबंध स्पर्धेचे मी मताधिकार बजावणार कारण, मी नव्या युगाचा/युगाची मतदार व मी माझं मत विकणार नाही हे तीन विषय होते. निबंध स्पर्धेत एकूण पंधरा स्पर्धकांनी सहभाग नोंदवला. यात कनिष्ठ गटात अनुक्रमे होजान तडवी (बारावी विज्ञान) प्रथम व गणेश पाटील (बारावी कला) द्वितीय तर वरिष्ठ गटात राधिका बुरूजवाले (एफ वाय बी कॉम) प्रथम,कोमल पाटील (एफ वाय बी एस सी) द्वितीय, पूजा पाटील (एफ वाय बी एस सी) तृतीय क्रमांकाने यशाचे मानकरी ठरले. मतदार दिवस या विषयावरील प्रश्नमंजुषा स्पर्धेत २७३ स्पर्धकांनी सहभाग नोंदवला.यात अनुक्रमे धनश्री पाटील प्रथम, प्रिती निळे द्वितीय व कोमल सोनवणे तृतीय क्रमांकाने यशस्वी झाल्या. या स्पर्धा प्राचार्य डॉ. संध्या सोनवणे यांच्या मार्गदर्शनाखाली राबविण्यात आल्या. परीक्षक म्हणून डॉ. सुधा खराटे यांनी काम पाहिले. स्पर्धांचे आयोजन उपप्राचार्य प्रा. संजय पाटील, प्रा.एस.आर. गायकवाड, डॉ. सुधीर कापडे यांनी केले. स्पर्धा यशस्वी करण्यासाठी उपप्राचार्य प्रा. एम.डी. खैरनार, प्रा. ए.पी.पाटील, डॉ. आर.डी.पवार व ईश्वर पाटील यांनी परिश्रम घेतले.

ePaper देशोन्नती
Tue, 01 February 2022
https://deshonnati.digitaledition.in/c/65969402